


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २८१ वा | शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# कारवाईसाठी जिगर लागतेय!

## रेती तस्करांना १४ कोटींच्या नोटिसा तर ४ महसूल अधिकाऱ्यांचे निलंबन!

### बीडचे खमके कलेक्टर पाठक यांचे धाडसी पाऊल..पण बुलढाण्यात काय?

**जनसंचलन/बुलढाणा**

बोकाळलेल्या अवैध रेती तस्करीला ब्रेक लावत बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी गेवराई येथे अनेक तस्करांना १४ कोटी दंडाच्या नोटीसा बजावल्या तर ४ महसूल अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.हाच कारवाईचा गेवराई पॅटर्न बुलढाणा जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी राबविल्यास शासनाचा कोट्यावधींचा महसूल वाचू शकतो,असे मत व्यक्त होतेय.बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील वाढती अवैध रेती तस्करी पाहता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिगरबाज कारवाई केली. ४ महसूल अधिकाऱ्यांचे निलंबन व त्यानंतर वासनवाडीच्या एका माफियाला ७ कोटी दंडाची नोटीस व नंतर काही जणांना तब्बल १४ कोटीच्या दंडाच्या नोटीस पाठवल्या असल्यामुळे रेती माफियात खळबळ माजली आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यात देखील रेती माफीयांनी धुमाकूळ घातला असून,तत्पूर्वी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, पोलीस अधिकारी, आरटीओ आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची मॅरेथॉन बैठक घेवून अवैध उत्खनन व वाहतुकीविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेत.परंतु रेती तस्कर मोकाट असून,नुकतेच एका तलाठ्याला एका टिप्परने उडविल्याची घटना घडली आहे.बुलढाणा



जिल्ह्यात ४० रेती घाट आहेत. मात्र लिलाव झाला नाही पण रेती तस्करी जोमात आहे. तस्करांना महसूल विभागातील काही अधिकारी, कर्मचारी यांची साथ लाभत असल्याने रेती माफिया व महसूल अधिकारी गब्बर होत असल्याचे बोलल्या जातेय. दरम्यान रेती माफियांवर बीडचे कलेक्टर अविनाश पाठक यांनी गेवराईत केलेली जिगरबाज कारवाई बुलढाणा जिल्ह्यात कधी होईल ? याकडे जिल्हा वासियांचे लक्ष लागून आहे.

# मेहकर बायपास हॉटेल मोगरासमोर अपघात दोन जण गंभीर

**जनसंचलन/मेहकर**




मेहकर सुलतानपूर रोडवरील बायपास रोड मेहकर हॉटेल मोगरासमोर भरधाव टाटा आयशरने मोटरसायकलला उडवले. यामध्ये दोन जण गंभीर जखमी झाले आहे. ही घटना दिनांक नऊ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मेहकर बायपास हॉटेल मोगरासमोर नऊ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर क्रमांक -४०, -६१ ५० या आयशर चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने आपल्या जवळील वाहन चालवत मोटरसायकल क्रमांक २०, -४४ २३ या मोटर सायकल ला धडक दिली. यामध्ये मोटर सायकल स्वार करण कैलासराव उबरांडे वय वर्ष २० रा-पांगरी तालुका-बुलढाणा, व प्रसाद भास्कर रक्ताडे वय वर्ष २० सेल्सुर तालुका-बुलढाणा, हे दोन युवक गंभीररित्या जखमी झाले आहे. घटनेची माहिती मिळतात मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार भाऊरावजी घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनचे कर्मचारी जायभाये साहेब, व इतर सहकारी ताबडतोब घटनास्थळावर पोहोचून त्या दोन जखमी युवकांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. अपघात इतका भीषण होता की, मोटरसायकल वरील युवकाच्या पायाचे दोन तुकडे झाले असे घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर असणाऱ्या नागरिकांनी प्रतिक्रिया दिली आहे. बातमी लिहीपर्यंत पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली नव्हती. परंतु आयशयर व मोटरसायकल पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आली असून, या अपघाताची माहिती जखमीच्या संबंधित नातेवाईकांना मेहकर पोलिसांनी दिली आहे.

# चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले!

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रात चिकुनगुनियाचा फैलाव आणि रुग्णंची संख्या वाढली असल्याचे सांगण्यात येत असून, बुलढाणा जिल्ह्यातही २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये चिकुनगुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. २०२३च्या तुलनेत तिपटीने रुग्ण वाढले आहेत. राज्यात नागपूर, मुंबईमध्ये चिकुनगुनियाचा सर्वाधिक संसर्ग आहे. त्या तुलनेत बुलढाणा जिल्ह्यात तो नगन्यसा म्हणावा लागेल. दरम्यान, आरोग्य विभागाकडून सध्या सर्वेक्षण करण्यात येत असल्याची माहितीही सूत्रांनी दिली. या आजाराची डेंग्यूसारखी लक्षणे असली, तरी या आजारासाठी भिन्न उपचारांची



आवश्यकता असते. मध्यंतरी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ पर्यंत आकडेवारी प्रसिद्ध केली होती. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यात २०२३ मध्ये ३० रुग्ण चिकनगुनियाने ग्रस्त होते, तर २०२४ मध्ये ही संख्या जवळपास तिपटीने वाढून ८७ झाली आहे.

# डोळ्यांचे पारणे फेडणारा जन्मोत्सव माँ जिजाऊ नगरी दुमदुमणार!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

दि.१२ जानेवारी रोजी राजमाता जीजाऊ यांची जयंती साजरी केली जाते.दरवर्षी प्रमाणे दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जीजाऊ यांच्या जन्मोत्सवाचे आयोजन त्यांचे जन्मगाव सिंदखेड राजा येथे करण्यात आलेले आहे. राजमाता जीजाऊ भक्तांना त्यांचा जीवन पट माहिती व्हावा,माँ जीजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज यांचेवर केलेले संस्कार व स्वराज्य स्थापनेत त्यांचा असलेला सिंहाचा वाटा याबाबत विषेश कार्यक्रमाद्वारे नागरीकांना या गोष्टी माहीती व्हाव्यात याकरीता सांस्कृतीक कार्य विभागाद्वारे आयोजीत व जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा व नगर परीषद प्रशासन विभाग यांचे विशेष सहकार्याने दिनांक १० व ११ जानेवारी रोजी सायं.६.३० ते रात्री १०.०० पर्यंत ङ्क्षजीजाऊ गाथा महोत्सवाचेफ्न आयोजन श्री.लखुजीराजे जाधव राजवाडा (राजमाता जीजाऊ जन्मस्थळ) परीसर,सिंदखेड राजा जि.बुलढाणा येथे होणार आहे.१० जानेवारी रोजी जीजाऊ वंदन, महाराष्ट्राची लोकधारा हा कार्यक्रम होणार असुन प्रसिध्द सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी व १०० कलाकारांचा समुह यामध्ये सहभागी होणार आहे.तसेच दिनांक ११ जानेवारी,२०२५ रोजी महाराष्ट्रातील प्रसिध्द गायक नंदेश उमप यांचा कार्यक्रम होणार आहे.दिनांक १० व ११ जानेवारी




रोजी होणारा जीजाऊ गाथा महोत्सवाचा कार्यक्रम विनामुल्य ठेवण्यात आलेला आहे.या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरीकांनी उपस्थित राहावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, सांस्कृतीक कार्य विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा व नगर परीषद प्रशासन विभागाचे वतीने करण्यात येत आहे.

# वरुड येथे भाजपा सदस्यता नोंदणी अभियानाचा शुभारंभ




**जनसंचलन/ चिखली**

चिखली विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार मा.सौ. श्वेताताई महाले पाटील यांच्या नेतृत्वात तथा भाजपा जिल्हाध्यक्ष मा.डॉ.गणेश मांटे साहेब, जिल्हा सरचिटणीस देविदास पाटील जाधव, जिल्हासचिव मा.अॅड. सुनील देशमुख, तालुकाध्यक्ष अॅड.मोहन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा मोर्चा तालुकाध्यक्ष सतिश भाकरे पाटील, तालुका सरचिटणीस गोपाल तायडे यांच्या सहकार्याने आज वरुड येथे प्रवासी कार्यकर्ता म्हणून युवा नेते योगेश राजपूत यांनी भाजपा सदस्यता नोंदणी अभियाचा शुभारंभ केला. भारतीय जनता पार्टीच्या विचारावर व देशाचे महामहीम पंतप्रधान ना.नरेंद्रजी मोदी साहेब आणि राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री ना.देवेन्द्रजी फडणवीस साहेब यांच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेऊन ८८००००२०२४ या टोल फ्री क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन स्थानिक गावकरी बंधु-भगिनींनी भाजपाचे सदस्यत्व स्विकारले. यावेळी भाजपा नेते प्रकाश राऊत, कमलाकर उबाळे, अनिल उबाळे, पंडितराव राऊत, नारायण गोरे, विकास पोतदार, सुनिल भिवसनकर, मुकूंदा काळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या अभियानासाठी बुथ प्रमुख मा.सुरेश भिवसनकर व चक्रधर राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय रस्सीखेच स्पर्धेत रिया कपाटेला कांस्यपदक

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र टंग ऑफ वार असोसिएशन यांच्या वतीने २ ते ४ जानेवारी दरम्यान चिंचणी बीच समुद्र किनारा बोईसर (पालघर) येथे ३६ व्या राष्ट्रीय रस्सीखेच अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये मुलींच्या ३८० किलोग्रॅम वजन गटात महाराष्ट्राने कांस्यपदक पटकावले आहे. या संघात रिया कपाटेचाही सहभाग होता. त्यामुळे तिला कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक असलेले श्रीराम निळे प्रशिक्षक असलेल्या महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने ५०० किलोग्रॅम वजन गटात सुवर्णपदक पटकावले. मिक्स कॅटेगरीत चौथ्या क्रमांकावर राज्याला समाधान मानावे लागले




# आदिवासी विकास मंत्र्यांच्या खासगी सचिवपदी ललीतकुमार वऱ्हाडे!

## जिल्ह्यातील आणखी एक अधिकारी मंत्रालयीन सेवेत जिल्ह्याला मंत्रालयीन सेवेचा वारसा!

**जनसंचलन/बुलढाणा**




राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा.अशोक उईके यांच्या खासगी सचिवपदी उपजिल्हाधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे यांची नियुक्ती झाली आहे. वऱ्हाडे यांच्या नियुक्तीने जिल्ह्यातील आणखी एका अधिकाऱ्यास मुंबई येथे मंत्रालयीन सेवेत काम करण्याची संधी मिळाली आहे. उपजिल्हाधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे मूळचे मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी गावचे रहिवासी आहेत. त्यांनी वणी, मोर्शी, चांदुर रेल्वे, कारंजा लाड येथे उपविभागीय अधिकारी तर बुलढाणा, यवतमाळ येथे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. सध्या ते नांदेड येथे रोजगार हमी योजना उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मूळगावी दहावीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांनी बुलढाणा येथून बारावी आणि डीएडचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. अध्यापनाचे कार्य करीत असतांना त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु ठेवली. त्याद्वारे त्यांची उपजिल्हाधिकारी पदी निवड झाली. उपजिल्हाधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे हे समाजशील अन खिलाडूवृत्तीचे अधिकारी म्हणून ओळखले जातात. सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच हिरिरीने सहभाग असतो. यासोबतच ते सर्वोत्तम खेळाडू आहेत. क्रिकेट, रनिंग,सायकलिंग, खो-खो, हॉलीबॉल खेळात त्यांनी प्राविण्य मिळवले आहे. आतापर्यंत ५० पेक्षा अधिक मॅरेथॉनमध्ये त्यांनी सहभाग नोंदवला आहे. तसेच जगातील अतिशय खडतर समजली जाणारी दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉन त्यांनी वेळेत पूर्ण केलेली आहे. सुदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळ खेळणे आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

**जिल्ह्याला मंत्रालयीन सेवेचा वारसा!**

जिल्ह्याला मंत्रालयीन सेवेचा वारसा आहे. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी मुंबई मंत्रालयात उत्तम कार्य केले आहे. विद्याधर महाले सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खासगी सचिव आहेत. मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी मंत्रालयात विविध विभागात काम केले. त्यांना मंत्रालयीन प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. माजी उपजिल्हाधिकारी सुनील शेळके तत्कालीन कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांचे विशेष कार्य अधिकारी होते. आता ललीतकुमार वऱ्हाडे यांची आदिवासी विकास मंत्र्यांचे खासगी सचिव म्हणून नियुक्ती झाल्याने मंत्रालयीन कामकाजाचा वारसा पुढे चालू राहणार आहे.

# अज्ञात व्यक्तीकडून विद्युत रोहित्राचे नुकसान...

## पळशी सुपो शिवारातील शेतकऱ्यांची महावितरणकडे धाव

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

तालुक्यातील पळशी सुपो शेतशिवारातील राठी यांच्या शेतात असलेल्या विद्युत रोहित्राचे अज्ञात व्यक्तीने नुकसान केले आहे. वीजपुरवठा करणाऱ्या बॉक्सची तोडफोड केल्याने कृषी पंपांचा वीज पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दि. ८ जानेवारी रोजी महावितरणच्या कार्यालयात धाव घेत निवेदन दिले. ऐन रब्बी पिकांना पाण्याची आवश्यकता असताना विद्युत रोहित्राचे नकसान झाल्याने वीजपुरवठा बंद आहे. त्यामुळे विद्युत रोहित्रावरील नवीन पेटी बसवून वीज पुरवठा सुरळीत करावा, तसेच पेटीचे नुकसान करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्याकडे निवेदनातून केली आहे, निवेदन देताना पळशी सुपो येथील शेतकरी ज्ञानेश्वर वानेरे, दिनेश राखोंडे, बळीराम वानखडे, प्रदीप वानखडे, सुपडा ठाकरे, संजय राखोंडे, नीलेश उभे, हरिदास फाळके, दिनकर अंगाईत, मधुकर दाभाडे, महादेव चव्हाण, प्रल्हाद बोंबटकार आदी शेतकरी उपस्थित होते.



जळगाव जामोद : निवेदन देताना पळशी सुपो शिवारातील शेतकरी.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जनता विद्यालयात सायबर क्राईम रस्ते सुरक्षा व शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रम संपन्न




जनसंचलन/बुलढाणा

दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी पिपळगाव सराई येथील देशोन्नती चे प्रतिनिधी व पत्रकार मा,सुनिल खडारे यांना भारतातील समाजिक समानता सात वी आंतर राष्ट्रीय परिषद राजधानी दिल्ली येथील ग्लोबल हुमन राईट् या संस्थेने पुरस्कार दिल्या बद्दल व जनता विद्यालय मध्ये आज सायबर क्राईम व रस्ते सुरक्षा तसेच शिष्यवृत्ती वाटप य कार्यक्रम संपन्न झाला.बायोस्टेट इंडिया लिमिटेड या कंपनीतर्फे जनता विद्यालयातील एकूण दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी अडीच हजार रुपये याप्रमाणे एकूण पंचवीस हजार मदत सदर कंपनीतर्फे करण्यात आली. त्याचप्रमाणे सायबर क्राईम वर रस्ते सुरक्षा हा कार्यक्रम रायपूर पोलीस स्टेशन अंतर्गत राबविण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री प्रमोद ठोंबरे हे होते. प्रमुख मार्गदर्शक रायपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री दुर्गेशजी राजपूत हे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये विद्यालयाचे स्थानिक सल्लागार श्री मदनराव गवते, साहेबराव गवते, सदाशिव शिंदे, भावसिंग सोळंके, बायस्टेट इंडिया लिमिटेड कंपनीचे मॅनेजर सतीश देशमुख , इंगळे सर , धंदर सर, शुभम शेवाळे, अजय पाटील शेवाळे, रामेश्वर पाटील गवते, सत्कारमूर्ती शंकरराव तरमळे तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. कांताताई तरमळे, सुनिल खंडारे पत्रकार, विठ्ठल सोनुने पत्रकार, शाम झगरे पत्रकार, गणेश अंभोरे पत्रकार व गणेश मोरे पत्रकार, बाजार समिती संचालक श्री सुनील गवते इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते, बायोस्टेट इंडिया लिमिटेड कंपनी तर्फे विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी अडीच हजार प्रमाणे पंचवीस हजाराची मदत करण्यात आली, त्यांना त्याची प्रमाणपत्र व त्यांचे स्वागत करण्यात आले, या विद्यार्थ्यांमध्ये वर्ग दहा चे दहा विद्यार्थी लाभार्थी म्हणून होते, कंपनीचे एरिया सेल्स मॅनेजर सतीश देशमुख साहेब यांनी कंपनीचा हेतू व उपक्रम सांगितले. सुनिल खंडारे पत्रकार यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला त्याचप्रमाणे विदेश दौरा आटपून आलेले शंकर तरमळे दाम्पत्य यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याविषयीं थोडक्यात माहिती जैष्ठ शिक्षक श्री पाटोळे सर यांनी दिली.महिला व बाल कल्याण अधिकारी श्री सपकाळ सर जिल्हा परिषद बुलढाणा हे सुद्धा कार्यक्रम साठी आवर्जून उपस्थित होते. बाल हक्क व बाल कायदा याविषयी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.मान्यवरांच्या हस्ते इको क्लब मार्फत सौं. प्रतिभा ठोंबरे यांनी दिलेल्या वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

रायपूर पोलीस स्टेशनचे निरीक्षक श्री दुर्गेश राजपूत साहेब यांनी रस्ते सुरक्षा व सायबर क्राईम, बाल सुरक्षा यावर प्रामुख्याने प्रकाश टाकला, अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद ठोंबरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन तथासूत्रसंचालन देविदास दळवी यांनी केले, आभार प्रदर्शन प्रा. सुधाकर सस्ते यांनी केले.फलक लेखन श्री असोलकर सर व खानंदे सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिप्रमं चे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे, सचिव प्रेमराजजी भाला, प्राचार्य प्रमोद ठोंबरे, पर्यवेक्षक आरसोडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# बुलढाण्यात पहिल्यांदाच म्हातारा तब्बल १५ दिवस डिजिटल अरेस्ट!

## तब्बल २८,३०,००० रुपयांची आर्थिक फसवणुक!

जनसंचलन/बुलढाणा

इंटरनेटचा आयुष्यात शिरकाव झाल्यामुळं आयुष्य सोपं झालं आहे, पण त्याचबरोबर अडचणींमध्येही वाढ झाली आहे. ऑनलाइन घोटाळ्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. हे घोटाळेबाज वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करत आहेत. डिजिटल अरेस्ट हा आता त्यात एक नवीन प्रकार उदयाला आला आहे.बुलढाण्यात देखील एका वृद्धाला डिजिटल अरेस्ट झाली आहे.वृद्धाची तब्बल २८,३०,००० रुपयांनी आर्थिक फसवणुक करण्यात आली आहे. बातमी अशी की, एक वृध्द इसम हातामध्ये थैली घेवून त्यामध्ये त्यांचे शेतीचे कागदपत्रे घेवुन बुलढाणा परीसरात फिरत होते. त्यांना अर्जेन्ट ती शेती विकून किंवा त्यावर लोन घेवून पैशांची गरज होती. ते त्यांचे मित्रांना भेटले परंतू काय गडबड आहे हे ते कुणालाही सांगु इच्छीत नव्हते. त्यानंतर त्यांचे अश्रु आणि भिती बघुन त्यांच्या मित्रांना काही गडबड असल्याचा संशय आला ते लगेच त्यांना बुलढाणा सायबर पोलीस स्टेशन येथे घेवून गेले तेथे पोहचले असता पिडीत वृध्द इसम यांनी सायबर पोलीसांना सांगीतले की, मी डिजीटर अरेस्ट मध्ये आहे माझे जवळ जास्त वेळ नाही मला तत्काळ घरी जाऊन त्यांना रिपोर्ट करावा लागेल. सायबर पोलीसांनी त्यांना धिर देवून त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता लक्षात आले की, सदर चे वृध्द इसम यांना २३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी व्हिडीओ कॉल आला. त्यामध्ये समोरची व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याच्या गणवेशामध्ये होती त्याने वृध्दाला सांगीतले की, आपके फोन नंबर को संदीग्ध पाया गया है आपके मोबाईल नंबर से मनी लॉन्ड्रीग हो रही है तसेच पोर्नोग्राफी संबधाने आपल्यावर बरेच गुन्हे दाखल झालेले आहेत. आता आपण चॉईस करा की आपल्याला पोलीसांनी घरी येवुन अटक करावी की, आपण डिजीटल अरेस्ट करीता तयार आहात. त्यावर वृध्दाने डिजिटल अरेस्ट करीता होकार देताच त्यांचे डिजिटल अरेस्ट सुरु झाले. त्यानंतर त्यांना सतत व्हिडीओ कॉल सुरु ठेवण्यास सांगीतले गेले. सतत व्हिडीओ कॉल सुरु असल्याने सदरचे वृध्द यांचा डाटा संपत असल्याने फ्रॉडस्टरांनी त्यांना ३० जीबीचे रिचार्ज करण्यास सांगीतले व रिचार्ज करुन येताच त्यांना रिपोर्ट करण्यास सांगीतले व ही बाब कुणाला सांगीतल्यास त्यांचेवर पण कारवाही करण्याचे पिडीतास सांगण्यात आले अशा प्रकारे सायबर फ्रॉडस्टरांनी सदर वृध्द इसम यांना धमकावुन त्यांना डिजीटल अरेस्ट करुन त्यांचे कडुन एकुण २८,३०,००० रुपये उकळले. यावरच सायबर फ्रॉडस्टर थांबले नाहीत तर त्यांनी सदर वृध्द इसम यांना व्हिडीओ कॉल करुन त्यांचे डॉक्यूमेंन्ट व्हेरीफीकेशनचे नावावर व्हिडीओ कॉलवरच त्यांचे कागदपत्रे बघितले. त्यामध्ये सदर वृध्द यांचे शेतीचे कागदपत्रांवर सदर फ्रॉडस्टरांची नजर पडली व अभी ये खेती बेच दो और हमे पैसे असा तगादा लावला म्हणून सदरचे वृध्द हे त्यांना रिपोर्ट करुन शेतीचे कागदपत्रे घेवून शेती विकण्यास घराबाहेर पडले शेती विकण्या करीता मित्रांमध्ये गेले असता त्यांचे मित्रांचे लक्षात आले की, काही तरी गडबड आहे व नंतर लगेच मित्रांनी सदर वृध्द इसम यांना सायबर पोलीसांकडे घेवुन गेले सायबर पोलीसांनी सदर वृध्द इसम यांना विश्वासात घेवुन त्यांचे समुपदेशन करुन त्यांना विचारणा केली असता सदर वृध्द ईसम यांनी पोलीसांना आप बिती सांगीतली त्यानंतर लगेच सायबर पोलीस स्टेशन येथे डिजीटल अरेस्ट बाबत २८,३०,००० रुपये आर्थिक फसवणुकीचा विवीध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान सायबर पोलीस पुढील तपास करीत आहे.

# चिडीमारी व छपरी व्यसनाधीन गँगला लगाम लावणार कोण?

जनसंचलन/बुलढाणा

चिडीमारी व छपरी व्यसनाधीन गँगला लगाम लावणार कोण? असा प्रश्न उपस्थित करीत,आझाद हिंद संघटनेने पोलिसांना निवेदन दिले आहे. यावेळी कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस यंत्रणेने सजग पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे. शहरातील शालेय विद्यार्थिनी, महिलांना रस्त्याने मार्गक्रमण करणे दुरापास्त झाले आहे.शाळा शिकवणी परिसरात गावगुंड आणि रोडरोमियोंची दहशत दैनंदिन वाढत असून, सुरक्षितता धोक्यात आली तर शहरातील बंद पडलेले सीसीटीव्ही बंद आहेत. दरम्यान आठ जानेवारीला दिलेल्या निवेदनामध्ये तहसील कार्यालय ते जिजामाता महाविद्यालय, सर्कुलर रोड, दरम्यान शाळा भरणे आणि सुटणेच्या वेळी रोड रोमिओ आणि छपरी गँगची दहशत आटोक्यात आणावी, जांभरून रोड, श्री शिवाजी हायस्कूल रोड, जिल्हा परिषद समोरील शासकीय महाविद्यालयाचे प्रांगण, आठवडी बाजार, जय हिंद चौक (नाईंटी चौक), राऊत कॉम्प्लेक्स, एआरडी मॉल मागील परिसर, जिजामाता शाळेचे प्रांगण, एकता नगर मधील नाट्यगृह, कदम हॉस्पिटल मागील प्रांगण, मलकापूर बायपास रोड आदी परिसरात खुलेआम पणे गांजा दारू पिऊन दैनंदिन वाद निर्माण होत असल्याने तो नियंत्रित करण्यात यावा, हुल्लडबाजी करने, चिडीमारी करणे, सार्वजनिक रित्या अश्लील व्हिडिओ पाहणे, यामुळे परिसरातील नागरिकांना नाहक मनस्ताप त्रास होत आहे. याबाबत नागरिकांनी तक्रारी देऊनही कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आझाद हिंद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीशचंद्र रोठे यांनी पोलिसांकडे निवेदन देऊन पोलिसांनी सदर समस्या सोडविण्याची मागणी केली आहे.

# माता नव्हे तू वैरणी!...

## त्या पोटच्या गोळ्याला कोणी फेकले?

जनसंचलन/बुलढाणा

राज्यभरात स्त्रीभ्रूण हत्याच्या घटनांनी खळबळ माजली असतानाच बुलढाणा शहरातील जेलच्या मागील भागात शेतकी शाळेच्या शिवारात नवजात पुरुष जातीचे अर्भक फेकून दिल्याचे आढळल्याने संताप व्यक्त होत आहे. नुकतीच ही घटना उघडकीस आली असून हे अमानुष कृत्य करणा-यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली जात आहे. हा तपास करण्याचे आव्हान शहर पोलिसांपुढे उभे ठाकले आहे. राज्यात स्त्रीभ्रूण हत्याच्या घटनांनी खळबळ उडाली आहे. अत्याचाराच्या घटनांना उधाण आल्याचे भयंकर चित्र दिसते. अशा अनुचित घटनांमध्ये बुलढाणा जिल्हा ही मागे नाही.घटना घडल्या की,पोलीस दप्तरी नोंद होते. परंतु पुढील तपास सुरूच असतो. येथील कारागृहाच्या पाठीमागे शेती शाळेजवळच्या शिवारात एका पुरुष जातीचे मृत अर्भक बेवारस स्थितीत आढळले. अज्ञात निर्दयी मातेने हे नवजात अर्भक फेकून दिले असावे.सदर घटनेची माहिती मिळाल्यावर



पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.अज्ञात इसमाने नवजात अर्भक फेकून दिल्याने त्याच्या विरुद्ध कलम ९४ बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास ठाणेदार ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक शशिकांत धारकरी करीत आहेत.

# धनादेश अनादरप्रकरणी दोन महिने कारावासाची शिक्षा

जनसंचलन/ चिखली

चिखली येथील बालाजी अर्बन पतसंस्थेकडून घेतलेले कर्ज थकविल्यानंतर न वटणारे धनादेश (चेक) देऊन पतसंस्थेची फसवणूक करणे एकाच्या चांगलेच अंगलट आले आहे. या प्रकरणी न्यायालयाने राहुल विजय इंगळे (रा. चिखली) याला दोन महिने साधा कारावास व ८४ हजारांचा दंड अशी शिक्षा ठोठावल्याची माहिती पतसंस्थेने दिली आहे. येथील बालाजी अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीकडून राहुल इंगळेंनी कर्ज घेतल्यानंतर ते थकविले होते. दरम्यान, थकीत कर्जाच्या भरण्यापोटी १६ नोव्हेंबर २०२१ रोजी एका बँकेचा ४२ हजारांचा धनादेश दिला होता. सदर धनादेश खात्यात पुरेसा निधी नसल्यामुळे न वटवता परत आल्यामुळे पतसंस्थेने राहुल इंगळेविरुद्ध कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली होती. या प्रकरणाची दिवाणी व फौजदारी न्यायालयात चिखली येथे २ जानेवारी २०१५ रोजी सुनावणी झाली. यामध्ये न्यायाधीश एच. डी. देशिंगे यांनी संस्थेच्या बाजूने निकाल देताना १३८ एन. आय. ॲक्ट १८८१ च्या गुन्ह्याकरिता फौ. प्र. सं. १९७३ च्या कलम २५५/२ नुसार राहुल इंगळे यांना दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा तसेच ८४ हजार रोख दंड व दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त शिक्षा सुनावली आहे. कोर्टात संस्थेकडून ॲड. व्ही. डी. सदार यांनी काम पाहिल्याची माहिती पतसंस्थेने दिली आहे

# आ. संजूभाऊ गायकवाड यांच्याकडून पत्रकारांना विम्याचे कवच कुंडल

## सुमारे १० लाखांचा विमा उतरवणार उद्याच्या मेगा कॅम्पमध्ये सहभागी होण्याचे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

समाजाचे आरोग्य सांभाळणारा पत्रकार हा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असतो. समाज हिताची काळजी घेणाऱ्या पत्रकाराची काळजी घेतली जावी, त्याला जीवन सुरक्षा प्रदान व्हावी, या उदात्त हेतूने बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजूभाऊ गायकवाड यांनी पत्रकारांना विमा संरक्षण देण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला आहे. उद्या, शुक्रवार, १० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता बुलढाणा जिल्हा पत्रकार भवन या ठिकाणी आयोजित विम्याच्या मेगा कॅम्पमध्ये पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून करण्यात आले आहे.

मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून ०६ जानेवारी मराठी पत्रकार दिनी पत्रकारांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ५० पेक्षा अधिक पत्रकारांनी सहकुटुंब आरोग्य तपासणी करीत शिबिराचा लाभ घेतला होता. त्याचवेळी पत्रकारांना विम्याची संरक्षण असावे, असा एक सूर पत्रकारांमधून उमटला होता. पत्रकारांच्या या आवाहनाला बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजू भाऊ गायकवाड यांनी पहिला प्रतिसाद देत पत्रकाराला विमा संरक्षणाची हमी दिली आहे. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाची विनंती मान्य करीत आ. गायकवाड यांनी भारतीय डाक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या १० लाख रुपयांच्या अपघाती विम्याची पत्रकारांसाठी तरतूद केली आहे. तरी पत्रकार बांधवांनी उद्या १० जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता बुलढाणा जिल्हा पत्रकार भवन या ठिकाणी




उपस्थित राहून आमदार गायकवाड यांच्यातर्फे काढल्या जाणाऱ्या या विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने केले आहे. अधिक माहितीसाठी ९८५०३७७३४४, ९८९०९३६३२२, ९४२२२६६३४५, ९९२२३५९६७४यापैकीकुठल्याही क्रमांकावर संपर्क करता येईल. विमा संरक्षणासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड,आणि ईमेल आयडी हे असणार आहेत.

# वडगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

जनसंचलन/मोताळा

तालुक्यातील शिव मंदिर तीर्थक्षेत्र श्रृंगेश्वर संस्थान वडगाव (खं) येथे मागील ३८ वर्षांपासून भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी रविवार १९ जानेवारीपासून संगीतमय रामायण कथा, अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. कथा वाचन गुरुवर्य महंत स्वामी ब्रम्ह स्वरूपानंद गिरी महाराज करणार आहे. दि. २६ जानेवारी रोजी हभप वासुदेव शास्त्री महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकडा आरती, ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ रामायण कथा, सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ, रात्री ८:३० ते १०:३० किर्तन होणार आहे. १९ जानेवारी रोजी कृष्णा महाराज २० जानेवारी ज्ञानेश्वर महाराज, २१ जानेवारीला मंगेश महाराज, २२ जानेवारी योगीनीताई आळंदीकर, २३ जानेवारी संभाजी महाराज शिरके २४ जानेवारी ज्ञानेश्वर महाराज गावंडे २५ जानेवारी रोजी शिवदास महाराज राहणे (, २६ जानेवारी रोजी रामायण ग्रंथाची शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958